# “पाश्चात्य तत्त्वज्ञानातील अस्तित्ववाद - एक चिकित्सक अभ्यास”

प्रबंध अहवाल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या **मानव्य विद्या शाखेंतर्गत तत्त्वज्ञान विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केलेला संक्षिप्त गोषवारा**


**संशोधक**

दत्तात्रय ज्ञानोबा श्रीमंगले.

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. सुनील वसंतराव साळुंके

प्राध्यापक व विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

**संशोधन केंद्र**

महात्मा बसेश्वर महाविद्यालय, लातूर.


**2025**

# पाश्चात्य तत्त्वज्ञानातील अस्तित्ववाद - एक चिकित्सक अभ्यास

## प्रास्ताविक :-

तत्त्वज्ञानातील विविध विचार प्रवाहाबरोबरच समकालीन पाश्चात्य तत्त्वज्ञानातील 'अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा विचार प्रवाह हा विविध समस्यांनी ग्रस्त व अस्तित्वाचा विसर पडलेल्या समाज जीवनाला उपयुक्त ठरतो, यात आत्मिक उन्नतीस मुभा आहे व निर्बंधाशिवाय जीवनाचा मुक्त आनंद घेण्यास पोषक विचार दिसून येतात. त्याचबरोबरच आपण घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची जबाबदारी स्वतःवर येऊन पडते. आपले उत्तर दायित्व ठरते. रोजची होणारी दगदग, नैराश्यपणा, ऋक्षपणा यापासून दूर जाऊन आत्मनिर्भर स्वयंभू व जीवनाचा आनंदाचा मुक्त अनुभव घेण्यास प्रवृत्त करते. जागतिक यांत्रिकीकरणात जीव हा कृत्रिम बनला आहे आपले अस्तित्व अकृत्रिम व सुंदर घडवणे यात अभिप्रेत आहे.

अस्तित्ववादाला इ.स १९ व २० शतकातील विचारवंताने विकसित केले. १९ व्या शतकात होऊन गेलेला सोरेन किर्कैगार्ड हा अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा संस्थापक होय. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाला ईश्वरवादी व निरेश्वरवादी विचारवंत या दोघांच्या विचारांची झालर असून त्यात किर्केगार्ड, यास्पर्स, मासेल, माविन वेबर, पॉल वर टिलीच यांचा समावेश पहिल्या गटात होतो. तर हायडेगर, सार्थ अलबेर कामु यांचा समावेश दुसऱ्या गटात येतो. या संशोधना सर्व अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या विचारांचा अभ्यासपूर्वक विचार केला आहे. अस्तित्ववादी तत्त्वज्ञान समाज उपयोगी कसे आहे व तणावमुक्त जीवन जगण्यास उपयुक्त कसे ठरेल याची मांडणी यात करण्यात येणार आहे.

## उद्दिष्टे :-

संपूर्ण विश्वाकडे पाहिल्यास असे दिसून येते की सर्वत्र दगदग, ताणतणाव,ऋक्षपणा, नैराश्य यामुळे समाज ग्रासलेला दिसून येतो. त्यातून बाहेर पडण्यासाठी अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन मानवी जीवन सुखकर करता येईल या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे सांगता येतील.

१) मानवी अस्तित्वाच्या मूलभूत रचनेचे विश्लेषण करणे.

२) मानवाच्या सारभूत स्वातंत्र्यात व्यक्तींना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणे.

३) मानवी व्यक्तिमत्त्वाचे व आत्म जीवनाचे अपहरण करणाऱ्या प्रवृत्ती पासून रक्षण करणे.

४) अस्तित्वाचे अकृत्रिम व सुंदर दर्शन घडविणे.

५) आत्मनिर्भर जीवन जगण्याचा मार्ग दाखविणे.

६) जीवनाला यांत्रिक, ऋक्ष व निरस न बनवता जीवन प्रेरक बनवणे.

७) जीवनाच्या आनंदाचा मुक्त अनुभव घेण्यास प्रवृत्त करणे.

८) आत्मजीवनाचे प्रभुत्व पुन: प्रस्थापित करणे.

९) आत्मनिष्ठ जीवन जगण्यास प्रवृत्त करणे.

१०) आत्मजीवनाचे सार्वभौमत्व प्रस्थापित करणे.

११) कर्तुत्वसंपन्न पुरुषार्थी जीवन जगण्यास प्रेरणा देणे.

१२) अर्थपूर्ण जीवन जगण्यास अस्तित्वादाची संकल्पना प्रेरणा देते.

## गृहितके :-

१) नैराश्यग्रस्त लोकांना जीवन संजीवनी देण्यास उपयुक्त.

२) स्व निर्णयास व स्वातंत्र्यास पुष्टी देणारा विचार.

३) आपण घेतलेल्या निर्णयास, स्वातंत्र्यास व त्याच्या परिणामास स्वतः जबाबदार.

## संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनास अभ्यास करताना प्रामुख्याने विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. समकालीन पाश्चात्य तत्त्वज्ञानाने मांडलेले तात्विक विचार व अस्तित्ववादी संकल्पनेचे विश्लेषण केले जाईल. विश्लेषणात्मक अध्ययन केले जाईल.

## सिद्धांत कल्पना :-

पाश्चात्य तत्त्वज्ञानातील अस्तित्ववादाच्या संकल्पनेनुसार आपण आपले पुरुषार्थी जीवन जगत असताना कोणतीही कुचंबणा न होऊ देता कसे जगता येईल आत्मिक उन्नती, भौतिक उन्नती कशी साधता येईल व आनंददायी जीवन कसे जगता येईल याचा दृष्टिकोन अस्तित्ववादाच्या संकल्पने द्वारा प्राप्त करता येतो. व्यक्तीला एकमेकांकडे पाहण्याचा व जगाकडे पाहण्याचा तसेच स्वतःकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन दूर होऊन व्यापकत्व येईल व आपला दृष्टिकोन उदात्त होईल असे मला वाटते.

## संशोधनाची व्याप्ती :-

संशोधनाची व्याप्ती ही समकालीन पाश्चात्य तत्त्वज्ञानातील अस्तित्ववादावर चिकित्सक अभ्यास एवढ्या पुरतीच मर्यादित असून इतर काही भारतीय व पाश्चात्य दर्शनाचा उल्लेख होण्याची शक्यता आहे.

## प्रकरण पहिले :- प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात अस्तित्ववादाच्या माहिती सादर करण्यात येणार आहे. या अनुषंगाने संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन पद्धती, सिद्धांत संकल्पना, संशोधनाची व्याप्ती आणि संशोधनावर येणाऱ्या मर्यादा यांचा उल्लेख केला जाईल.

## प्रकरण दुसरे :- अस्तित्ववाद या संकल्पनेचा परिचय

अस्तित्ववाद या शब्दात अंतर्भूत असलेला मूळ शब्द **'अस्तित्व'** हाच अस्तित्ववादाचा पाया व गाभा आहे. या विषयीचे चिंतन प्रामुख्याने मानवी अस्तित्वाच्या मूलभूत रचनेचे विश्लेषण करणे आणि मानवाच्या सारभूत स्वातंत्र्यात व्यक्तींना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणे याच्या भोवती केंद्रित झालेले आहे.

मानवाने स्वतः ला निरस व ऋक्ष न बनवता अकृतिम आत्मप्रेरणांना निष्ठावंत राहून नवनवीन रीतीने जीवन प्रेरणा व्यक्त करीत राहून त्यातून सतत आत्म अभिव्यक्ती व आत्मसाक्षात्कार करीत राहिले पाहिजे असा मोलाचा संदेश अस्तित्वात देतो.

## प्रकरण तिसरे :- अस्तित्व आणि सार तत्व

अस्तित्ववादी विचारानुसार मानवी अस्तित्व व त्याच्या स्वतःच्या असण्याचे जाणीव असते ती अभिव्यक्ती विविध प्रकाराने व्यक्त होते. परंतु इतर निर्जीव वस्तूंना ती नसते. अस्तित्व आणि सार तत्व यांच्यात परस्पर भिन्नता असली तरी त्यांच्यात एक विशिष्ट संबंध असतो कारण अस्तित्वाशिवाय सारतत्व हे निरर्थक असते.

## प्रकरण चौथे :- मानवी अस्तित्व आणि जाणीवरूप सत्ता

तत्वज्ञानाचा मूलभूत प्रश्न किंवा विचारधारा ही तत्व म्हणजे सत्य शोधन प्रक्रियेत सामावलेले आहे. आणि ह्याच सत्य तसेच सत तत्त्वाचा व जाणीवरूप

सत्ता काय आहे याची चर्चा यात करण्याचा प्रयत्न आहे. मानवी अस्तित्व स्व जाणिवेतून व्यक्त होत असते. स्व ची जाणीव रूप सत्ता महत्त्वपूर्ण ठरते.

## प्रकरण पाचवे :- स्वहेतूक सत्ता

अस्तित्ववादी तत्त्वज्ञानात व्यक्तीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे जगणे व स्वातंत्र्याचा उपभोग घेणे अपेक्षित आहे आणि हा नैसर्गिक स्वभाव आहे. स्वत: बंदिस्त न राहता बाहेर पडून स्वतःच्या निवडीचे जीवन जगावे वाटते न आवडीच्या बाबतीत नकार द्यावासा वाटतो व ते स्वातंत्र्य आहे. त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे किंवा परिणामाच्या चांगल्या वाईट स्वतः जबाबदार राहावे लागते.

## प्रकरण सहावे :- निष्कर्ष

प्रस्तुत प्रबंधात अस्तित्ववादाचा चिकित्सक अभ्यास केल्यास ठोस निष्कर्षा पर्यंत जाण्याची शक्यता आहे. अस्तित्ववादी तत्त्वज्ञाना मध्ये संपूर्ण विश्वातील मानवजातीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देऊन आनंदी व प्रेरणादायी कसे जगता येईल याची प्रचिती आणून दिली आहे. व्यवहारीक जगतात जगताना रोजच्या ताण तणावातून मुक्त होऊन स्वतःच्या अस्तित्वाकडे हेतूपूर्वक लक्ष दिले तर आपले जीवन यांत्रिक न होता आनंददायी होईल याचा अनुभव येऊ शकतो.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास-डॉ. ग. ना. जोशी

२) अस्तित्ववादी तत्त्वज्ञान -प्रा डॉ. लीला गोळे

३) अस्तित्ववादी विशेषांक-परामर्श नोव्हेंबर १९९९, अंक२१ खंड ३ पुणे विद्यापीठ पुणे.

४) समकालीन पाश्चात्य दर्शन- बसंत कुमार लाल

५) अस्तित्ववादाची ओळख- दि. के. बेडेकर

६) अस्तित्ववादी भूमिका मानस घटना शास्त्र व तार्किक दृष्टार्थ वाद - पि.डी. चौधरी

७) अस्तित्ववाद -प्रा. रवींद्र मनोहर

८) पाश्चात्य दर्शन के संप्रदाय- डॉ.शोभा निगम

९) अस्तित्ववाद विशेषांक- विचारशलाका डॉ. ना.ल. कुंभार

१०) तत्त्वज्ञानातील आधुनिक विचार प्रवाह- प्रा. सौ. माधवी कवी

११) सार्त्र का अस्तित्वातवाद - प्रभा खेतान

संशोधक

दत्तात्रय ज्ञानोबा श्रीमंगले.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनील वसंतराव साळुंके

प्राध्यापक व विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.